मे  महिन्यात करावयाची शेतीची कामे –

१) खरीप हंगामासाठी पुर्ण मशागतीची कामे पुर्ण करावीत. उदा. नांगरणी. ढेकळे फोडणी कुळवणी इत्यादी.

२) फळबागेची लागवड करावयाची असल्यास फळबागेच्या प्रकाराप्रमाणे योग्य अंतरावर आखणी करून ३ X ३ X ३ फूट आकाराचे खड्डे खोदून उन्हामध्ये चांगले तापू द्यावेत.

३) उन्हाळी मुग भात इ. पिकाची काढणी करावी.

४) खरीप हंगामासाठी आवश्यक त्या प्रकाराच्या बियाणे जातीचे खते किटकनाशके इत्यादीची पेरणीपूर्वी वेळेवर मिळण्याची तरतूद करावी.

५) विदर्भ मराठवाडा खान्देश विभागात बागायती कापसाची लागवड करावी लागवडी साठी कृषि विद्यापिठांनी संशोधीत केलेल्या सुधारीत किंवा संकरीत जातीची निवड करावी उदा. नामदेव, एकनाथ, पी.के.व्ही. रजत एल.आर.ए.५१६६. फुले ४९२, ३८८

६) पश्चीम महाराष्ट्रातील लागवड केलेला बागायती उन्हाळी कपाशीच्या वरखताचा दुसरा हप्ता द्यावा ४० किलो नत्र.

७) खरीप हंगामासाठी लागणारी औजारे उदा. कुळव, दुचाडी पाभर कोळपी, खुरपी फवारणी पंप धुरळणी यंत्र इत्यादी. योग्य स्थीतीत दुरूस्त करून ठेवावीत.

८) हळद आले सुरण या पिकांची लागवडीसाठी हळदीच्या राजापूरी कृष्णा कडप्पा सेलम आलेची माहिम जातीची निवड करावी.

९) जमिनीचा मगदूर तापमान बाष्पीभवन इ. विचारात घेऊन फळबाग ऊस व इतर उन्हाळी पिकासाठी पाणी द्यावे तसेच गव्हाचे काड ऊसाचे पाचट भाताचा पेंका लागडाचा भुसा पॉलिथीन इत्यादीचे जमिनीवर अच्छादन करावे.

१०) हिरवळीच्या खतांसाठी पाण्याची उपलब्धता किंवा वळवाचा पाऊस झाल्यास जमिनीत भरपूर ओलावा झाल्यास ताग ३० ते ३५ किलो एकरी किवा धैचा १५ ते २० किलो एकर पेरणी करावी.

११) द्राक्षाला खतांचा हप्ता द्यावा एप्रिल छाटणी पूर्ण झाल्यास २०० किलो नत्र १०० किलो स्फूरद व ११० किलो पालाश प्रति हेक्टर प्रमाणे शेणखतासोबत द्यावे.

कृषि विज्ञान केंद्र
बारामती

## Field operations to be carried out in the month of May

1. Complete all the tillage operations for Kharif season. Eg. Ploughing, clod crushing, harrowing etc.
2. In case if fruit crops are to be taken then dig out pits according to the type of fruit garden at suitable distance of 3 x 3 x 3 feet and then keep them exposed to the sun.
3. Complete the harvesting of Summer green gram, rice etc.
4. Make sure for the availability of seeds, fertilizers, pesticides before sowing of kharif crops.
5. Complete the sowing of irrigated Cotton in vidharbha, marathwada and khandesh region of maharashtra. Choose various improved or hybrid varieties for the sowing which are recommended by the agricultural universities of maharashtra. For eg.Namdeo, EKnath, rajat, LRA-5166, Phule 492, 388 etc.
6. Provide the second dose of Nitrogen @ 40 kg per hectare for the cotton which has sowed in Western Maharashtra as a summer crop.
7. Do repair and keep in good conditions the implements which are necessary for the kharif season. Eg.harrow, double bowl seed drill, weeder, sprayer and dusters etc.
8. Select varieties rajapuri, Krishna, Kadappa, Selam for the planting of turmeric and mahim for the planting of ginger crop.
9. Provide the irrigations to the fruit crops, sugarcane and other crops considering the soil condition, temperature, evaporation rate etc. Do mulching of wheat straw, sugarcane trash, rice husk, wood powder, polythene etc.
10. Taking in account the water availability, summer rainfall, carry out sowing of sunhemp @ 30-35 kg per acre or dainchya @ 15-20 kg per acer
11. If April pruning has completed in grape then provide the dose of 200 kg Nitrogen, 100 Phosphrus, and 110 kg potash per hectare mixed in farm yard manure.